REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.


# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख ७ सप्टेंबर, १९३८ अंक ३६



# किर्लोस्कर

**२५ फुटांहून खोल विहिरीसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.**

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

**हुगळी पंप**

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा!

**किर्लोस्कर बंधु लि. : : किर्लोस्करवाडी, सातारा**

---

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोमाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

---

## The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

**Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.**

---




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यत: विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, होकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )**
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

## विविध माहिती

### म्हैसूर संस्थानांतील नवीन धरण

म्हैसूर संस्थानांतील अर्कावती नदीवर धरण बांधण्यांत यावयाचें आहे. ह्या धरणासाठीं २,२०० एकर जमीन भिजेल व त्यांतील मळेवाल्यांच्या लागवडीस उत्कृष्ट पाणीपुरवठा होईल. धरणाची लांबी ६०० फूट आणि उंची ३६ फूट होणार आहे.

### अहमदाबाद येथील गिरण्यांतील कापडाचा उठाव

"अहमदाबाद कपास कापडाच्या गिरण्यांतून, १९३८ च्या पहिल्या सहामाहींत एकूण ३ लक्ष, ६० हजार गाठी कापड बाहेर गेलें. १९३७ च्या पहिल्या सहामाहींतील तत्सम आकडा ३ लक्ष, ५० हजार गाठी, इतका होता. अहमदाबाद येथील गिरण्यांच्या कापडास मागणी नसल्यानें माल पडून आहे, अशा आशयाची प्रसिद्ध झालेली बातमी निराधार आहे" असें अहमदाबाद मिल ओनर्स असोसिएशनच्या सेक्रेटरीनें एक पत्रक काढून जाहीर केलें आहे. गिरण्यांतील उत्पादनहि पूर्ववत चालू असल्याचें त्या पत्रकांत म्हटलें आहे.

### नोकरी मिळाली, कीं संशोधन बंद

मुंबई येथील रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्यें संशोधन कार्य चालतें व बी. एससी. नंतरचें उच्च शास्त्रीय शिक्षण तेथें दिलें जातें. प्रत्येक विद्यार्थ्यामागे ६३४ रुपये सालिना खर्च येतो. त्यापैकीं ५३१ रुपये सरकारकडून मिळतात. नोकरी मिळतांच संशोधनकार्य सोडून देण्याची विद्यार्थ्यांत प्रवृत्ति आढळते. शिष्यवृत्तीचा त्याग करून आणि मिळालेली रकम परत करून नोकरी स्वीकारण्याच्या विद्यार्थ्यांच्या तत्परतेचा इन्स्टिट्यूटच्या अहवालांत उल्लेख करण्यांत आला आहे.

### सोलापूर वीव्हिंग अँन्ड स्पिनिंग कं. लि.

वरील कंपनीस, ३१ मार्च, १९३८ अखेर संपलेल्या वर्षी, ३ लक्ष, ५७ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागावर ६० रुपये डिव्हिडंड देण्याचें ठरलें.

### श्वासोच्छ्वास आणि हृदयाचे ठोके

प्रत्येक मनुष्य दर मिनिटास साधारणपणें १६ वेळां श्वासोच्छ्वास करतो. म्हणजे, दर तासास ९६० वेळां, दर वर्षास ८,४,०९,६०० वेळां आणि सबंद आयुष्यांत (७० वर्षें) मिळून एकूण सुमारें ५९ कोटि वेळां तो श्वासोच्छ्वास करतो. छातीचे ठोके मिनिटास ७२ वेळां पडतात. म्हणजे वरील मुदतींत हृदयाचे २ अब्ज, ६५ कोटि ठोके पडतात.

### गव्हाची लागवड

१९३७-३८ च्या मोसमांतील हिंदुस्थानमधील गव्हाच्या पिकाच्या सरकारी अंदाज प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून हिंदुस्थानांतील गव्हाची एकूण लागवड ३ कोटि, ५६½ लक्ष एकर असून त्यांपैकीं १८½ लक्ष एकर मुंबई प्रांतांत आहेत, असें समजतें. पंजाब, संयुक्त प्रांत आणि मध्यप्रांत व वऱ्हाड ह्या प्रांतांचा गव्हाच्या पिकाचे दृष्टीनें हिंदुस्थानांत अनुक्रमानें पहिला, दुसरा आणि तिसरा नंबर लागतो.

### ग्रेटब्रिटन आणि आयर्लंड--५½ हजार बेटें

ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंड आणि त्यांच्या आजूबाजूचीं बेटें मिळून एकूण ५½ हजार बेटें "ब्रिटिश आइल्स" ह्या संज्ञेंत येतात. त्यापैकीं ५ हजार बेटें आयर्लंडच्या किनाऱ्याभोंवतीं आहेत. ह्या सर्वांपैकीं फक्त ४२० बेटांवर वस्ती आहे आणि त्यांतील १८६ बेटें स्कॉटलंडमध्यें आहेत.

### कोंकणपट्टीवरील बोटींची वहातुक

कोंकणपट्टीवरील बोटींची वहातुक पावसाळ्याच्या पूर्वार्धांत बंद होती ती पुनः सुरू झाली आहे. मुंबई आणि कोंकणांतील बंदरें ह्यांचे दरम्यान दरसाल सुमारें १२½ लक्ष उतारूंची ये-जा होते.

### बॉंबे टेलिफोन कंपनीचे नवीन शेअर्स

बॉंबे टेलिफोन कंपनी लि. नें प्रत्येकी ५० रुपये किंमतीचे ४०,२५२ ऑर्डिनरी भाग विक्रीस काढले आहेत, ते भागीदारांस त्यांच्या प्रत्येक पांच भागांस एक, ह्या प्रमाणांत मिळूं शकतील.

### चहाचा खप

१९३६-३७ सालीं हिंदुस्थानांत एकूण ८ कोटि, ४० लक्ष पौंड चहा खपला. १९३५--३६ सालांतील खपाचे मानानें हा उठाव १ कोटि, १० लक्ष पौंडांनीं अधिक आहे. हिंदुस्थानामध्यें चहाची लोकप्रियता वाढत आहे, असें हे आकडे दर्शवितात.

### पुणें शहर म्युनिसिपॅलिटीचें नवें कर्ज

पुणें शहर म्युनिसिपॅलिटीनें शहरांतील रस्ते ॲस्फॉल्टचे करण्यासाठीं ७ लक्ष रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें, त्यांपैकीं ३ लक्ष रुपये मार्च, १९३८ मध्यें उभारण्यांत आले. आतां ४ लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स तिनें विक्रीस काढलीं आहेत. व्याजाचा दर ४% आहे. कर्जाच्या रकमेच्या शतमानानें विवक्षित भाग दरसाल परत करण्यांत येऊन १९४८-४९ नंतर सबंद कर्जाची पुरी परतफेड होईल. कर्जाचीं टेंडरें स्वीकारण्याची शेवटची तारीख १० सप्टेंबर ही आहे.

### इटलीमधील ज्यू लोकांची संख्या

इटलीमध्यें ज्यू लोकांचें इटालियन लोकसंख्येशीं प्रमाण १०००:१ असें आहे, तें वाढूं न देण्याची खबरदारी इटालियन सरकार घेणार आहे.

### हिंदुस्थानच्या लोकसंख्येंत १० वर्षांत ११ टक्के वाढ होणार

सन १९३१ ते १९३६ ह्या मुदतींत हिंदी लोकवस्तीमध्यें शेकडा ६·१ इतकी वाढ झाली आहे. ह्याच गतीनें लोकसंख्या वाढल्यास, १९४१ मध्यें लोकसंख्या एकूण ४० कोटि होईल. १९३६ सालीं जन्मलेल्या अर्भकांत मुलग्यांचें व मुलींचें प्रमाण १०८:१०० असें पडलें. जगांतील सर्व देशांत हीच प्रवृत्ति असली तरी मुलांच्या जननाची संख्या मुलींच्या जननापेक्षां इतकी अधिक इतरत्र नसल्याचें आढळतें. १९३६सालीं घडून आलेल्या मृत्यूंपैकीं शेकडा २५ एक वर्षाखालील अर्भकांचे होतें. ग्रेटब्रिटनमध्यें हें प्रमाण शेकडा केवळ ७ इतकेंच पडलें.

### ट्रेझरी बिलांवर १० आ. १० पै व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आ. १० पै इतका पडला.

### सर्चलाइटसाठी ५० लक्ष रुपये

कॅनडा देशाच्या पॅसिफिक महासागराच्या बाजूच्या किनाऱ्यावर देखरेख करण्याकरितां त्या देशानें ११३ सर्चलाइट बसविण्याचें योजिलें आहे. त्यांस सुमारें ५० लक्ष रुपये खर्च येईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| २१-८-३८ ते २७-८-३८ | ४,७१,४७५ |
| २८-८-३८ ते ३-९-३८ | ७,६७,८१० |
| २१-९-३१ ते ३-९-३८ | ३,१९,२९,४०,६७२ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४३४ | ६ सहकारी चळवळ ... | ४३९ |
| २ रिझर्व्ह बँकेचा आर्थिक आढावा ... ... | ४३५ | ७ शंभर वर्षांपूर्वीचा रेल्वे प्रवास ... ... | ४४१ |
| ३ सहकार ... ... | ४३६ | ८ फ्रान्स देशाचे खरे सूत्रचालक ... ... | ४४१ |
| ४ ग्वालेर येथील गणेशोत्सवांत ज्ञानसत्र ... | ४३६ | ९ कपास बाजाराचें क्लिअरिंग हाउस ... ... | ४४१ |
| ५ स्फुट-विचार ... | ४३७ | १० विमाविषयक एक दावा | ४४२ |
| सहकारी बँकांचा संघ-घराच्या गहाणावरील कर्जें-कालाप्रमाणें शिक्षणांत बदल होण्याची आवश्यकता—हिंदी सोन्याच्या निर्गतीचें समर्थन | | ११ कॉटन एक्सचेंजमधील उद्घाटन समारंभ... | ४४२ |
| | | १२ निवडक बाजारभाव | ४४३ |


# अर्थ

बुधवार, ता. ७ सप्टेंबर, १९३८

## रिझर्व्ह बँकेचा आर्थिक आढावा

### १९३७-३८ सालाचें समालोचन

हिंदुस्थान सरकारच्या चलन खात्याचें काम रिझर्व्ह बँकेकडे गेल्यानंतर हिंदुस्थानांतील चलनविषय व्यवहाराचा अहवाल त्या बँकेमार्फत प्रसिद्ध होऊं लागला. १९३५-३६ आणि १९३६-३७ सालासंबंधीं अहवाल गेल्या वर्षी प्रसिद्ध झाला आणि १९३७-३८ सालविषयक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. प्रस्तुत रिपोर्टाच्या वर्षाचे पहिल्या सहामाहींत व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांची समाधानकारक प्रगति होत होती, तिला जागतिक कारणांमुळें पुढें व्यत्यय आला. वर्षाचे आरंभीं, रिझर्व्ह बँकेनें, वाढत्या व्यापारास सहाय व्हावें, ह्या हेतूनें पैसा खेळविण्यासाठी जरूर ती उपाय योजना केली, परंतु तिला लवकरच हात आखडता घेणें प्राप्त झालें. अहवालाचे वर्षअखेर, मंदीनें पुनः उचल खाल्लेली दिसते आणि बाजारभावांत झालेली सुधारणा अल्पकालीन ठरून त्यांत पुनरपि घट झालेली आढळते. अमेरिकेंतील कपाशीच्या पिकांत बरीच मोठी वाढ झाली असल्याचें प्रसिद्ध झाल्यापासून हिंदी कपाशीचा भाव मंद राहिला आहे. कपाशीची निर्गतहि कमी झाली आणि त्याचा परिणाम रेलवेजच्या उत्पन्नावर झाला. कपाशीच्या भावांतील उतार आणि जपानी स्पर्धेच्या तीव्रतेचा कमजोरपणा, ह्यांमुळें हिंदी कपास कापडाच्या गिरण्यांस चांगली संधी मिळाली. त्यांनीं आपलें उत्पादन वाढवून हिंदुस्थानांतील बाजार पेठांत आपलें स्थान दृढ केलें आणि जवळपासच्या देशांकडे कापड निर्गत करण्यासहि प्रारंभ केला. लोखंडाच्या व पोलादाच्या कारखान्यांसहि गेलें वर्ष चांगलें गेलें. हिंदुस्थानाच्या परराष्ट्रीय व्यापाराचा आढावा "अर्था"मध्यें मागेंच येऊन गेलेला असल्यानें, त्यासंबंधीं येथें पुनः उल्लेख करण्याचें कारण नाहीं.

रिझर्व्ह बँकेच्या अहवालांत हुंडणावळीसंबंधानें गेल्या वर्षाचा आढावा घेण्यांत आला आहे. रिझर्व्ह बँक ॲक्टाच्या ४० व ४१ ह्या कलमांचे अन्वयें हिंदी रुपया स्टर्लिंगशीं कायदेशीरपणें जोडण्यांत आला आणि बँकेनें रुपयाचें ब्रिटिश स्टर्लिंगमध्यें रूपांतर करतांना रुपयास १ शिलिंग $५\frac{४९}{६४}$ पेन्स ह्या दरानें किंमत घेतली पाहिजे व स्टर्लिंग विकत घेतांना १ शिलिंग $६\frac{३}{१६}$ पेन्स दिले पाहिजेत, असा नियम घालण्यांत आला. गेल्या सालीं हुंडणावळीचा दर वरच्या पातळीशींच कायम राहिला आणि ह्या दराची वर्षांतील सरासरी १ रुपया =१ शीलिंग, ६.०९ पेन्स अशी पडली. मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारें व ब्रह्मदेश ह्यांस ग्रेट-ब्रिटनमध्यें पैसे उपलब्ध करून देण्याचें काम रिझर्व्ह बँक दर आठवड्यास त्याबाबत टेंडरें मागून करतें. १९३७-३८ मधील स्टर्लिंगची सर्व खरेदी १ रुपया = १ शिलिंग, $६\frac{१}{८}$ पेन्स ह्या दरानें बँकेनें केली. एप्रिल, १९३७ चे आरंभीं स्टर्लिंगला जोराची मागणी होती, परंतु पुढें ती मंदावली. १९३७-३८ मध्यें रिझर्व्ह बँकेनें एकूण $३२\frac{१}{३}$ कोटि रुपये किंमतीचें ब्रिटिश चलन हिंदी मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांस उपलब्ध करून दिलें. परंतु, त्यांच्या एकूण मागणीची पूर्तता करण्यासाठी तिला ग्रेट ब्रिटनमधील स्वतःच्या निधींतून सुमारें $१\frac{१}{४}$ कोटींची तजवीज करावी लागली. हिंदी निर्गतीचे मानानें आयात प्रमाणाबाहेर वाढली आहे आणि हिंदी सोन्याच्या निर्गतीचा प्रवाह ह्यापुढें कायम वाहणें अशक्य आहे. अशा परिस्थितींत हुंडणावळीच्या दरांत उतार घडवून आणण्याचा यत्न न करतां ग्रेटब्रिटनमधील आपल्या निधींचा उपयोग हुंडणावळ उचलून धरण्याकडे करण्याची रिझर्व्ह बँकेवर पाळी आली. ही परिस्थिति अशीच किती काळ टिकणार ? ह्याविषयीं बँकेच्या रिपोर्टांत उल्लेख नाहीं.

अहवालाचे वर्षी हिंदुस्थान सरकारच्या कोणत्याच कर्जांची परतफेड करण्यांत आली नाहीं आणि भांडवली खर्चहि फार झाला नाहीं; त्यामुळें नवीन कर्जाची उभारणी करण्याचें प्रयोजन नव्हतें. तथापि, हिंदुस्थान सरकारनें विलायतेंत उभारलेलें कर्ज आणि हिंदुस्थानांत उभारलेलें तत्सम कर्ज ह्यांच्या रोख्यांचे किंमतीमधील तफावतीचा फायदा घेऊन रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारच्या सांगण्यावरून स्टर्लिंग रोखे विकत घेऊन ते सरकारकडे वर्ग केले, म्हणजे सरकारनें त्यांची किंमत लिहून टाकली. हिंदी रोख्यांच्या विक्रीपासून झालेल्या फायद्याचा विनियोग कर्जाची एकूण रकम कमी करण्याकडे केला गेला. ३१ मार्च, १९३७ रोजीं हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानांत व ग्रेटब्रिटनमध्यें अनुक्रमें ४३८ कोटि व ३९१ कोटि रुपये कर्ज देणें होतें, तें ३१ मार्च, १९३८ रोजीं ४३९ कोटि रुपये व ३८७ कोटि रुपये असें झालें. रुपयांतील आणि स्टर्लिंगमधील एकाच व्याजाचे दराच्या रोख्यांचे किंमतीमधील तफावतीचा हिंदुस्थान सरकारनें जसा फायदा घेतला, त्याचप्रमाणें खासगी व्यक्तींनींहि हिंदी रोखे विकून त्याचे पैसे इंग्लंडमध्यें आणि इतर देशांत गुंतविण्याचा उद्योग केला. बँक रेट अहवालाचे वर्षी ३ टक्के कायम राहिला. २८ नोव्हेंबर, १९३५ रोजीं तो $३\frac{१}{२}$ टक्क्यांचा ३ टक्के करण्यांत आला आणि तो अद्याप तसाच आहे. इंपीरिअल बँकेचा हुंडी रेटहि ३ टक्केच होता. मुंबईमधील श्रॉफ लोकांचा हुंडी डिस्कौंट करण्याचा दर सरासरीनें ५ ते ६ टक्के राहिला. रिझर्व्ह बँकेनें आपल्या नोटा १ जानेवारी, १९३८ रोजीं प्रथम प्रचलित केल्या. नोटांची लोकप्रियता वाढत आहे, ह्याचें गमक म्हणजे रुपयाचें नाणें वाढत्या प्रमाणांत बँकेकडे परत येत आहे हें होय. ही गोष्ट समाधानकारक समजली पाहिजे.

## सहकार

### प्रो. काळे ह्यांचें ग्वालेर येथील व्याख्यान

ग्वालेरच्या गणेशोत्सवांत प्रो. काळे ह्यांचें मुख्य व्याख्यान "सहकार" ह्या विषयावर झालें. त्याचा गोषवारा खाली दिला आहे:—

माझ्या व्याख्यानाचा विषय निश्चित करण्यांत मोठें औचित्य प्रदर्शित करण्यांत आलें आहे ह्यांत शंका नाहीं. येथील सहकारी संस्थांच्या परिस्थितीची मी केलेली चौकशी, त्या बाबतींत मी केलेल्या शिफारसींची चर्चा करण्यासाठी गेल्या जानेवारींत भरलेली परिषद् आणि महाराजसाहेबांनीं ह्या विषयासंबंधानें स्वीकारलेलें सहानुभूतीचें व औदार्याचें धोरण ह्या सर्व गोष्टी आपल्या स्मरणांत असतीलच. सहकारी संघटनेच्या बाबतींत अनेक लोकांचे गैरसमज आहेत ते दूर होणें अगत्याचें आहे. जगांतील सर्व राष्ट्रांत सहकारी संस्थांचा सारखा विस्तार होत आहे ह्यावरून त्यांची उपयुक्तता सर्वांस पटली असल्याचें सिद्ध होत आहे. राष्ट्रें इंग्लंडसारखीं भांडवलशाही-प्रधान असोत, जर्मनीसारखीं फॅसिस्ट असोत किंवा रशिया-प्रमाणें कम्यूनिस्ट असोत, शेतकरी व कामगार वर्गाचें संघटन सहकारी पद्धतीचें असावें ह्या विषयीं त्यांची एकवाक्यता आहे. ह्याच कारणानें सहकारी चळवळ हिंदुस्थानांत मूळ धरून बसली आहे आणि ग्वालेर संस्थानांत सहकारी संस्थांची प्रगति व सुधारणा घडवून आणण्याचें महत्त्व त्यावरूनच सिद्ध होत आहे.

उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांची सध्याची व्यवस्था तीन-चार प्रकारची आहे. सरकार, भांडवलवाले, लहान-सहान शेतकरी व कारागीर आणि सहकारी संस्था अशी त्यांची चतुर्विध वर्गवारी करतां येईल. मोठ्या प्रमाणावर चालणारे धंदे श्रीमान लोकांच्या पैशावर नफ्यासाठी चालवले जातात. त्यांच्यांशी स्पर्धा करणें बिनभांडवली शेतकरी व कारागीर ह्यांस अतिशय कठिण होतें. आपल्या उत्पादनाच्या व उपभोगाच्या गरजा गरीब व शक्तिहीन लोकांस भागवण्याची पंचाइत पडते. अशा परिस्थितींत सहकारी संघटनाचा त्यांस मोठा उपयोग होतो. एका बाजूस व्यक्तिस्वार्थ व नफेबाजी आणि दुसऱ्या बाजूस व्यक्तिस्वातंत्र्याचा नाश व समाजसत्तेचा सर्वांवर फिरणारा वरवंटा अशा दोन टोकांच्या मधला सुवर्णमध्य सहकारानें साधतां येतो. सध्याच्या राजकीय व आर्थिक उलाढालींच्या काळांत मध्यम स्थितींतल्या व सामान्य जनतेच्या हिताचा उपाय सहकारी संघटन हाच आहे.

आपल्या खेडेगांवांत जनता सहकारानेंच वागत आली आहे. आजकाल त्या सहकारास योग्य वळण मात्र दिलें पाहिजे. भांडवलाचा पुरवठा, मालाच्या विक्रीची व्यवस्था इत्यादि बाबी शेतकरी व कारागीर ह्यांस महत्वाच्या असूनहि त्यांचे संबंधांत त्यांस सावकार आणि दलाल ह्यांचेवर अवलंबून रहावें लागतें. त्यांचें सहकारी पद्धतीनें संघटन झाल्यास खेडेगांवांची सामुदायिक रीतीनें सुधारणा होण्यास संधी प्राप्त होईल. सहकारी संघटनाचा अनेक प्रकारांनीं उपयोग करून घेतां येतो ह्याचे दाखले हिंदुस्थानांतहि अनेक आहेत.

ग्वालेर येथें मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन झाल्यास लोकांचा शिलकी पैसा एकत्र जमा होऊन त्याचा उपयोग सामान्य स्थितींतल्या लोकांच्या हितार्थ करतां येईल. ह्यासाठी समजूतदार लोकांनीं व पुढाऱ्यांनीं ह्या प्रश्नांत लक्ष घालून आपापल्यापरीनें सहकारी संघटनास सहाय दिलें पाहिजे. ह्यामध्यें समाजहित आणि व्यक्तिहित ह्यांचा योग्य मेळ घालतां येऊन सर्व जनतेची उन्नति साधण्याचें श्रेय मिळेल. ग्वालेर सरकारची, विशेषत: महाराजांची, इच्छा अशी आहे कीं लोकांनीं त्यांच्या सहानुभूतीचा व सहायाचा पूर्ण फायदा घ्यावा. माझ्या व्याख्यानानें ह्या संबंधांत लौकिक जागृति उत्पन्न झाल्यास मोठें कार्य झालें असें मी समजेन.

---

## ग्वालेर येथील गणेशोत्सवांत ज्ञानसत्र

निरनिराळ्या प्रांतांतील विद्वानांचीं विविध विषयांवर व्याख्यानें करून आपल्या प्रजेस गणेशोत्सवांत ज्ञानामृत पिण्याची सोय ग्वाल्हेरच्या महाराजांनीं केली आहे. राजवाड्यांत, कॉलेजांत आणि नगरगृहांत हीं व्याख्यानें होतात; ह्याकारणानें त्यांचा फायदा सर्व जनतेस होतो. व्याख्यानें इंग्रजींत, मराठींत आणि हिंदींत होत असल्यानें तर सर्व लोकांची उत्कृष्ट सोय होते. उत्सवांत प्रो. काळे ह्यांचीं व्याख्यानें झालीं त्यांतलें पहिलें

### अर्थशास्त्र आणि नित्याचें जीवन

ह्या विषयावर झालें. अर्थशास्त्राचे प्रसिद्ध सिद्धांत आणि चालू आर्थिक घडामोडी ह्यांत मेळ दिसून न आल्यानें अर्थशास्त्रज्ञांच्या लिखाणासंबंधानें सामान्य लोकांच्या मनांत साशंक वृत्ति उत्पन्न झाली आहे आणि त्या शास्त्राचा रोजच्या जीवनाशी कांहीं संबंध आहे कीं नाहीं ह्याविषयीं त्यांस संदेह वाटत आहे. तोफांच्या गडगडांत कायदे मूक बनतात हें प्रसिद्ध वचन येथें उत्कृष्ट रीतीनें लागू पडतें. युद्धें आणि अनिवार्य राजकीय महत्त्वाकांक्षा ह्यांनीं जगास ग्रासल्यामुळें सामाजिक जीवनाचे प्रवाह नित्याचें पात्र सोडून भलतीकडे वाहू लागले असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. तथापि, अर्थशास्त्राच्या मुख्य सिद्धांतांस ह्यानें बाध येत नाहीं. महायुद्धाचे शेवटीं झालेल्या तहाचे असे परिणाम होणार हें प्रो. केन्ससारख्या नामांकित अर्थशास्त्रज्ञांनीं भाकित केलें होतें आणि सध्याच्या मंदींतून बाहेर पडण्याचे उपाय ते सुचवीत आहेत ते बदललेल्या परिस्थितीस अनुलक्षूनच आहेत. इतर शास्त्रांप्रमाणें अर्थशास्त्राची विशिष्ट परिभाषा आहे आणि त्याच्या विशिष्ट कल्पना आहेत. परंतु खोल विचार करणारांस त्या कल्पना सामान्य तारतम्य बुद्धीच्या माणसास सहज आकलतां येण्यासारख्या आहेत. चलन, बँकिंग, पदार्थांचे मोल, सोनें इत्यादि संबंधांत त्या अर्थशास्त्रीय कल्पना रोजच्या व्यवहारांस सोडून नाहींत, हें बारकाईनें पहाणारांस दिसून येतें. मनुष्यस्वभाव ध्यानांत वागवूनच अर्थशास्त्रज्ञांस आपले सिद्धांत बनवावे लागतात. विनिमय, मोल, पैसा ह्यांविषयींचे सिद्धांत सध्याच्या उरफाट्या जगास लागू पडत नाहींसे दिसतात. पण अर्थशास्त्रास राजकीय ध्येय नाहीं. विशिष्ट राजकीय आणि राष्ट्रीय ध्येयाचे मार्गे लोक लागले असतां त्यांचें आर्थिक वर्तन कसें होतें, हेंच त्यास पहावयाचें असतें. संरक्षक जकाती, सुवर्णसंचय इत्यादि प्रश्नांचा विचार ह्याच दृष्टीनें करावा लागतो. अर्थशास्त्राचा अभ्यास समाजाच्या नित्याच्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीनें केला पाहिजे. निवळ पुस्तकी ज्ञान व्यर्थ आहे. समाजाचें जीवन कमी हलाखीचें आणि अधिक सुखाचें कसें होईल इकडे लक्ष दिलें पाहिजे. नित्याच्या आर्थिक घडामोडींविषयींची चौकशी आणि त्यांची छाननी ह्यांवर अर्थशास्त्राच्या अभ्यासाची आणि अध्यापनाची उभारणी होणें आवश्यक आहे. तें एक विलायती शास्त्र आहे आणि तो केवळ कल्पनेचा किंवा तर्काचा खेळ आहे असें समजणें किंवा अशा प्रकारचें वर्तन करणें चुकीचें आहे.

# स्फुट विचार

## सहकारी बँकांचा संघ

गेल्या महिन्याच्या अखेरीस मुंबई येथें भरलेल्या सहकारी बँकांच्या परिषदेंत भणसाळी-मेथा रिपोर्टांतील शिफारसींचाच प्रामुख्यानें विचार झाला. सेंट्रल आणि अर्बन बँकांच्या कार्यांत एकसूत्रीपणा यावा म्हणून त्यांचा एक संघ स्थापन करण्यांत यावा ह्या त्यांमधील सूचनेस विशेष महत्त्व दिलें पाहिजे. सध्या त्यांची परिषद् मधून मधून भरविण्यांत येत असते आणि तिच्या घटनेंत कार्यकारी समितीचीहि व्यवस्था आहे. तथापि ह्या व्यवस्थेंत बँकांच्या कार्यास भरीव रीतीनें उपयोगी पडण्याचा गुण नसल्यामुळें अधिक जोमदार आणि कार्यक्षम अशी योजना करणें अगत्याचें होतें. बँकांची आर्थिक स्थिति, त्यांचे व्याजाचे दर, त्यांच्याजवळील मोकळा पैसा इत्यादि बाबतींत त्यांस सल्ला देऊन इष्ट बदल घडवून आणण्याचें कार्य नियोजित संघाचे कडून व्हावें अशी अपेक्षा आहे. हरएक बाबतींत रजिस्ट्रारचा सल्ला आणि नियंत्रण ह्यांच्या अनुरोधानें चालण्यापेक्षा बँकांना स्वतःच्या संघाच्या तंत्रानें चालणें हें केव्हांहि अधिक श्रेयस्कर आहे. बँकांच्या परस्परसंबंधांचे आणि त्यांच्या सामान्य धोरणाचे प्रश्न उद्भवल्यास त्यांचा निर्णय ह्या संस्थांच्या प्रातिनिधिक मंडळानें करावा हें त्यांच्या स्वावलंबनास आणि स्वातंत्र्यास उचित आहे. नियोजित संघाची स्थापना सहा महिन्यांचे आंत व्हावी असा ठराव परिषदेनें केला असून त्याची घटना निश्चित करण्यासंबंधानेंहि आवश्यक असलेली तजवीज केली आहे.

---

## घरांच्या गहाणावरील कर्जें

मध्यवर्ती बँकांनीं स्थावर मिळकतीच्या गहाणावर आपले पैसे गुंतवावे किंवा नाहीं आणि तसेंच अर्बन बँकांनीं अशाच गहाणावर व्यक्तिशः जामिनकीशिवाय कर्जें द्यावीं किंवा कसें ह्या प्रश्नासंबंधानें परिषदेनें स्पष्ट मत व्यक्त केलें. भणसाळी-मेथा रिपोर्टाचा अभिप्राय, इंडियन ट्रस्ट ॲक्टाचें कलम २० (ई) ह्याखाली मध्यवर्ती बँकांनीं घरांच्या वगैरे तारणावर पैसे गुंतवूं नयेत असा होता. घरांमध्यें बँकांचा पैसा गुंतून रहात असल्यानें त्यांचा व्यवहार नीट चालण्याच्या मार्गांत अडथळा येतो. ह्या तऱ्हेनें पैसा गुंतवणें म्हणजे सभासदांस घरांच्या गहाण तारणावर कर्ज देणेंच होय आणि ह्या प्रकारचीं कर्जें मध्यवर्ती बँकांच्या कक्षेंत येत नाहींत इत्यादि मुद्यांवर वरील अभिप्राय आधारलेला आहे. ह्या युक्तिवादांत पुष्कळ तथ्य आहे. परंतु घरांत पैसे गुंतवण्याची परवानगी बँकांस प्रथम रजिस्ट्रारनीं दिली आणि ती एकदम काढून घेणें इष्ट आहे काय ह्या प्रश्नाचा व्यावहारिक दृष्ट्या विचार होणें अगत्याचें आहे. ह्या व्यवहारांत रहाणारी कूस आर्थिक मंदीच्या परिस्थितींत बँकांस उपयोगी पडत असून ती नाहींशी झाल्यास परिणाम काय होईल हें लक्षांत घेतलें पाहिजे. प्रत्येक बँकेच्या बाबतींत विशिष्ट मर्यादा रजिस्ट्रारनीं दरवर्षी आखून द्यावी आणि तीमध्यें बँकांनीं घरांच्या गहाणांत पैसे गुंतवण्यास हरकत नाहीं असा ठराव परिषदेनें केला आहे, तो ह्या दृष्टीनेंच होय. अर्बन बँका स्थावर मिळकतीच्या तारणावर सभासदांस कर्जें देतात, त्यांमध्यें ह्या तारणाबरोबर जामीनहि घ्यावे ह्या सूचनेस विरोध करून परिषदेनें असें ठरविलें कीं, परत-फेडीच्या शक्तीच्या मानानेंच असलीं कर्जें दिलीं जावीं. व्यक्ती जामीन घेण्यांत जी सुरक्षितता आहे ती ह्याप्रमाणें उत्पन्न होईल अशी व्यवस्था झाल्यास इष्ट कार्यभाग सिद्ध होतो. योग्य किंमतीचें घर गहाण लावून देणाऱ्या माणसास पुन्हा जामीन पडाण्यास लावणें योग्य नाहीं असा परिषदेचा अभिप्राय पडला. जामीन रहाण्यास लोक तयार होत नाहींत ही येथें एक अडचण आहे. तथापि, अशीं कर्जें अत्यंत सावधगिरीनें आणि विशिष्ट मर्यादेच्या आंतच दिलीं पाहिजेत; नाहींतर बँकांवर संकट आल्यावांचून राहणार नाहीं ही भयसूचना येथें देणें मात्र अगत्याचें आहे.

---

## काळाप्रमाणें शिक्षणांत बदल होण्याची आवश्यकता

माटुंगा येथील खालसा कॉलेजच्या टेक्निकल इन्स्टिट्यूटचें उद्घाटन मुंबई सरकारचे गृहमंत्री, ना. मुनशी, ह्यांनीं नुकतेंच केलें. त्या प्रसंगीं त्यांनीं केलेल्या भाषणांतील सध्याच्या शिक्षणासंबंधीं विचार उल्लेखनीय आहेत. "आपण अद्याप पंडितांच्या काळांतच आहोंत, आणि विद्यार्थ्यांस ग्रीस देशाचा थोडासा इतिहास आणि थोडेसें संस्कृत पढवून तयार केलें म्हणजे आपण आपलें कर्तव्य बजावलें, असें मानून घेण्याची कला कॉलेजांच्या चालकांनीं चांगली साधली आहे. मुंबईमधील कॉलेजांतील शिक्षणांत वास्तवतेचा पूर्ण अभाव दिसून येतो. पदवीधरांस आपण फार मोठे विद्वान झाल्यासारखें वाटतें आणि ते हस्तव्यवसायाकडे आणि यांत्रिक शिक्षणाकडे तुच्छतेनें पहातात, असें त्यांनीं सांगितलें. शिक्षणाची पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली पद्धत आजच्या काळांत उपयोगी पडणार नसून, नवीन तऱ्हेचें शास्त्रीय, व्यावहारिक उपयुक्ततेचें शिक्षणच देशास तारूं शकेल, ह्या त्यांच्या विधानाची सत्यता निर्विवाद आहे. राष्ट्रीय जीवनाची आणि कॉलेजांतील वातावरणाची फारकत व कॉलेजमधील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहण्याची प्रवृत्ति, ह्यांविषयीं श्री. मुनशी ह्यांनीं खेद प्रदर्शित केला आणि सत्याग्रह करणें अगर तुरुंगवास पत्करणें पदवीधरांस आणि विद्यार्थ्यांस आपल्या दर्जाखालचें वाटावें, ह्यासंबंधीं त्यांनीं तीव्र नापसंती व्यक्त केली. कॉलेजांतील उच्च शिक्षणाची व्यावहारिक उपयुक्तता नष्ट होत चालली असून, शिकून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांतील बेकारीचा प्रश्न अत्यंत कठीण झाला आहे. विश्वविद्यालयीन शिक्षणापासून विद्यार्थ्यांच्या चारितार्थाचाहि प्रश्न सुटूं शकत नाहीं; मग राष्ट्रीय प्रगतीचा व्यापक प्रश्न दूरच राहिला! श्री. मुनशी ह्यांनीं उद्योगप्रधान शिक्षणाचें वर्णन केलेलें महत्त्व सर्वांस पटण्यासारखें आहे. सुशिक्षित तरुणांची विचारसरणी इतर लोकांस मार्गदर्शक होऊन ती राष्ट्रीय प्रगतीस पोषक असणें अगत्याचें आहे. शिक्षणाचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आतां सर्वांस पटली आहे; तथापि प्रत्यक्ष प्रगति कधीं होणार ?"

---

## हिंदी सोन्याच्या निर्गतीचें समर्थन

"सन १४९३ सालापासून सन १९३० पर्यंत हिंदुस्थानांत साठलेल्या सोन्याची किंमत कमींत कमी १४ अब्ज, ५४ कोटि रुपये भरेल, असा बँक ऑफ इंटरनॅशनल सेटलमेंट्सनें १९३४-३५ सालीं अजमास केला होता. हा आकडा खरा समजला, तर १९३१ सालानंतर आजपर्यंत हिंदुस्थानांतील सोन्यापैकीं ३ सोनें हिंदुस्थानास पारखें झालें आहे" अशी माहिती सर जेम्स ग्रिग ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीमध्यें दिली. "आपला माल ७० टक्के नफ्यानें विकून टाकून आलेलें उत्पन्न किफा-

फायदेशीर गुंतविणें हें हिंदुस्थानाच्या दृष्टीनें हितावेंच आहे; जमिनींत्लाली सोनें पुरून ठेवून काय फायदा ?" हा त्यांचा युक्तिवाद मात्र पटण्याजोगा नाहीं. कपास कापडाप्रमाणें सोन्याचें कारखान्यांतून उत्पादन होत नाहीं आणि हिंदी शेतकरी, सोनें विकून त्याचे पैसे किफायतशीर गुंतवितां येतील अशा हेतूनें आपलें सोनें विक्रीस काढीत नाहींत. आर्थिक दुःस्थितीचें तें लक्षण आहे, व्यवहारदक्षतेचा तो दाखला नव्हे, हें सर जेम्स ह्यांस समजत नसेल असें म्हणणें कठीण आहे. सोन्याच्या निर्गतीचा ओघ हा हिंदी परराष्ट्रीय व्यापाराचा एक कायमचाच भाग होऊन बसला आहे, असें मानून त्यावर विसंबून रहाणें दूरदर्शीपणाचें नाहीं, हें सांगावयास नको.

---

## धंदे आणि शिक्षण

### नामदार खेर ह्यांचें. भाषण

येथील चांभार विद्यार्थी मंडळाची अकरावी वार्षिक सभा सेवासदनच्या दिवाणखान्यांत ना. बाळासाहेब खेर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं गेल्या रविवारीं भरली होती. मंडळाचे अध्यक्ष, प्रो. काळे, ह्यांनीं संस्थेची स्थापना आपल्या कॉलेजांतील चांभार जातीच्या विद्यार्थ्यांनीं स्वबांधवांच्या उन्नतीच्या हेतूनें कशी केली, तिला स्पृश्य वर्गांतील मंडळींनीं कसें सहाय दिलें, तिनें मुलांमुलींस सहाय, मोफत वाचनालय, सामाजिक परिषदा इत्यादि संबंधांत विशिष्ट मर्यादेंत पण पद्धतशीर कार्य कसें चालविलें आहे ह्याची हकीकत सांगितली. अहवालवाचन, अंदाजपत्रकाची मांडणी, कार्यकारी मंडळाची निवड इत्यादि मामुलीं कामें झाल्यावर नामदार खेर ह्यांनीं बोधपर असें उत्कृष्ट भाषण केलें. चांभारांच्या कातडें कमावण्याच्या धंद्यांत सुधारणा व्हावी म्हणून त्यांस धंदेशिक्षण देण्याकरितां शाळेचा उपक्रम आपण अडचणीच्या परिस्थितींत कसा केला ह्याचें वर्णन करून सध्याच्या शिक्षण पद्धतीनें धंद्यांची उन्नति न होतां बेकारी कशी वाढत आहे हें त्यांनीं स्पष्ट केलें. धंद्याच्या उच्चनीचपणाविषयींच्या प्रचलित कल्पना सोडून देऊन चामड्याचा धंदा सुधारण्याचा यत्न करा आणि ह्या कार्यास पोषक होईल असेंच शिक्षण आपल्या तरुण पिढीस द्या असा त्यांनीं उपदेश केला. चांभार विद्यार्थी मंडळाच्या कार्यासंबंधानें पसंती दर्शवून व त्याच्या हातून भरीव धंदेशिक्षणाचें कार्य वाढत्या प्रमाणांत व्हावें अशी इच्छा प्रदर्शित करून नामदार खेर ह्यांनीं आपलें कळकळीनें व माहितीनें भरलेलें भाषण पुरें केलें. त्यांच्या भाषणापासून चांभार वर्गानें योग्य बोध घ्यावा आणि स्वतःचा धंदा सुधारून देशाच्या औद्योगिक उन्नतीस अप्रत्यक्षपणें सहाय करावें असें प्रो. काळे ह्यांनीं अध्यक्षांचे आभार मानतांना सांगितलें. धंद्याच्या उच्चनीचत्वाविषयींच्या कल्पनांमुळ अस्पृश्य वर्गांचा कोंडमारा होऊन राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गांत कशा अडचणी येत आहेत याची कल्पना त्यांनीं श्रोत्यांस करून दिली. राष्ट्रगीताचें गायन होऊन सभेचें काम पुरें झालें.

---

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

बोरगांव येथें बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. च्या कारखान्यांतील व फार्मवरील मंडळींनीं गणेशोत्सव साजरा केला.

---

**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

**"URBAN BANKS"**

BY

L. K. Bhagwat,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L K. Bhagwat. Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

शेअरवर चांगलें डिव्हिडंड वाटणाऱ्या
एका कारखान्याला ६ महिने ते ५ वर्षें मुदतीच्या
**ठेवी घेणें आहेत**
व्याज मुदतीप्रमाणें द. सा. द. शें. ४ ते ६ टक्के दिलें जातें. माहिती मागवितांना रक्कम किती व केव्हां गुंतविणें आहे तें लिहावें.
**आत्माराम रावजी भट, C/o केसरी कचेरी, पुणें २.**

पूर्वींची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें
**द. म. द. शें. ०४चार आणे व्याजानें**
व
**अनुक्रमानें रु. १०० ते २०००**
देण्याची नवीन योजना. **लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा.** त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ०२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.
**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**
हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें नं. २

## सहकारी चळवळ

### जमीन गहाणाच्या बँका

#### ठाणें, कुलाबा आणि मुंबई उपनगर ह्या जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांस विनंति

मुंबई प्रांतामध्यें सध्या तेरा प्राथमिक लँड मॉर्गेज बँका असून त्यांस खेळतें भांडवल पुरविणारी प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँक आहे. प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेनें, सरकारनें मुद्दलाबाबत आणि व्याजाबाबत हमी घेतलेल्या डिबेंचर्सचे स्वरूपानें, पैसे उभारले आहेत. शेतकऱ्यांस माफक व्याजाच्या दरानें दीर्घ मुदतीचें कर्ज—विशेषतः जमीन सुधारणा करण्यास लागणारें भांडवल—मिळावें, हा जमीन गहाणाच्या बँकांचा उद्देश आहे. पूर्वीच्या कर्जाचा बोजा कमी करण्यासाठीहि पुरेशा तारणावर आणि परत फेडीची पात्रता पाहून शेतकऱ्यांस कर्ज देण्यांत येतें. प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांचा व्याजाचा दर द. सा. द. शे. ६ टक्के आहे. शेतकऱ्यास परतफेडीचा वार्षिक हप्ता देतां येईल किंवा नाहीं हें ठरवितांना त्याच्या रोजच्या गरजा आणि त्याची रहाणी ह्यांस लागणाऱ्या खर्चाचा हिशेब लक्षांत घेण्यांत येतो.

लँड मॉर्गेज बँकेचें व्यवहारक्षेत्र आटोपशीर, दोन-तीन तालुक्यांपुरतें मर्यादित असावें. प्रत्येक तालुक्यांत एक लक्ष रुपयांचा व्यवहार झाला, तरी प्राथमिक लँड मॉर्गेज बँक फायद्यांत चालू शकेल आणि तिला व्यक्तिशः सभासदांवर नजरहि चांगली ठेवतां येईल.

लँड मॉर्गेज बँकांची ठिकठिकाणीं स्थापना व्हावी आणि शक्य तितक्या अधिक शेतकऱ्यांच्या गरजा भागविल्या जाव्या, असें सरकारनें ठरविलें आहे. मुंबई उपनगर, ठाणें आणि कुलाबा ह्या जिल्ह्यांची अशा बँका स्थापन करण्यासाठीं निवड झाली आहे. ठाणें जिल्ह्याचा पूर्व भाग (डहाणू–उंबरगांव पेट्यासह–, पालघर, वसई आणि वाडे तालुका) व सबंध मुंबई उपनगर जिल्हा ह्यांसाठी एक बँक स्थापण्यांत यावयाची असून पालघर येथें तिची कचेरी राहील. ठाणें महाल, कल्याण, भिवंडी व शहापूर हे ठाणें जिल्ह्यांतील दोन तालुके आणि पनवेल, पेण, कर्जत आणि अलिबाग हे कुलाबा जिल्ह्यांतील तालुके ह्यांसाठीं वेगळी बँक स्थापन होईल. तिची कचेरी ठाणें येथें राहील.

ग्रामसुधारणा आणि शेतकऱ्यांची आर्थिक उन्नति ह्यांमध्यें लक्ष घालणाऱ्या लोकहितदक्ष लोकांनीं मुंबई विभागाचे सहकारी पतपेढ्यांचे असिस्टंट रजिस्ट्रार (९, बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई) ह्यांचेकडून लँड मॉर्गेज बँकेच्या योजनेबाबत तपशील मागवावा आणि ह्या चळवळीस स्वतःस कोणत्या मार्गानें हातभार लावतां येईल, तें कळवावें, अशी विनंति आहे.

एस. जी. अलमौला
असि. रजिस्ट्रार,
कोऑपरेटिव्ह सोसायटीज, मुंबई विभाग.

मुंबई, २६ ऑगस्ट १९३८.

#### मिरजप्रांत व कुची तालुके को. सुपरवायझिंग यूनियन लि. सांगली

मिरज प्रांत व कुची तालुका को. स. यूनियन लि., सांगली या संस्थेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. ४ माहे सप्टेंबर १९३८ इ. रोजीं दुपारीं ३ वाजतां सांगली स्टेट सेंट्रल को. बँकेच्या ऑफिसांत भरली होती.

#### हवेली तालुका ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट असोसिएशन

वरील संस्थेची वार्षिक सभा रविवार तारीख २८।८।३८ रोजीं हवेली मामलेदार कचेरींत श्री. भा. म. गुप्ते, एम. ए., एलएल. बी., एम. एल. ए. पार्लमेंटरी सेक्रेटरी, लोकल सेल्फ गव्हर्मेंट, यांचे अध्यक्षतेखालीं झाली. सभेस श्री. व्ही. एम. जाधव, डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर पश्चिम भाग पुणें; श्री. जी. बी. पंडित हवेली मामलेदार; श्री. केसकर शहर मामलेदार; श्री. वाय. आर. दाते सहकारी जिल्हा इन्स्टिट्यूटचे प्रेसिडेंट; श्री. एस. के. पटवर्धन डिस्ट्रिक्ट ॲग्रिकल्चरल ओव्हरसिअर पुणें; श्री. एल. जी. गोखले, श्री. सासवडकर वगैरे सुमारें २०० मंडळी हजर होती. सभेंत संस्थेच्या एकंदर कार्यासंबंधीं व संस्थेचा शेतकरी वर्गानें जास्तींतजास्त फायदा करून घ्यावा, संस्थेचा प्रचारहि जास्ती करावा वगैरे बाबत श्री. जाधव प्रांतसाहेब, श्री. पंडित मामलेदार हवेली, श्री. दाते, श्री. पटवर्धन, श्री. गोखले वगैरे मंडळींचीं भाषणें झालीं.

श्री. बापुसाहेब गुप्ते, एम. एल. ए. म्हणाले:—"शेतकरी वर्गानें संघटित प्रयत्न करून सहकारी पद्धतीनें स्वावलंबी तत्त्वाची कास धरिल्याशिवाय उन्नतीचा मार्ग नाहीं. शेतकऱ्यांनीं आपल्याभोंवतीं सहकारी चळवळीचें जाळें करून राहिलें पाहिजे. खरेदी, विक्री वगैरे सर्व व्यवहार सहकारी सोसायट्यांच्यातर्फेच झाले पाहिजेत. नाहींतर बी-बियाणें देणाऱ्या सहकारी सोसायट्यांचा फायद्याकरितां आश्रय करून व शेतीचें उत्पन्न आल्यानंतर तें धान्य मात्र सेल सोसायटीतर्फे जर विकलें नाहीं, तर दलालाकडे व सावकाराकडेच आपला पैसा जाईल व मग विक्रीकरितां निघालेल्या सोसायट्या तरी काय करणार ? शेतकरी वर्गानें प्रत्येक बाबतींत सरकारच्या मदतीची व नियंत्रणाकरितां सरकारी कायद्यांची अपेक्षा करीत बसूं नये. कारण कोणताहि कायदा पास झाला, तरी त्यायोगें संपूर्ण उद्देश साध्य होतो असें नाहीं. सरकारला शेतकरी वर्गाकरितां जें काय करितां येणें शक्य आहे तें जरूर करीतच आहे, परंतु शेतकऱ्यानें मात्र स्वस्थ बसून चालणार नाहीं. शेतकरी वर्ग बोलका झाला पाहिजे. शेतकरी वर्गाची एकी झाली पाहिजे. "गांव जें करील तें राव करणार नाहीं" असें माझें नेहमीं सांगणें असतें, व हें एकीशिवाय साध्य होत नाहीं."

आयत्या वेळच्या विषयांत खालील एक महत्त्वाचा ठराव पास करण्यांत आला. "फळट व भाजीपाला विक्रीकरतां आला तर दलालानें खरेदी किंवा विक्री करणाऱ्या अशा कोणाकडूनहि रुपयास एक आण्यापेक्षा जास्त कमिशन किंवा धर्मादाय फंड वगैरे घेण्यांत येऊं नये. त्याचप्रमाणें शेतकऱ्यांच्या इतर मालाच्या विक्रीबाबतहि कमिशनचे दर ठरविण्यांत यावे व कोणत्याहि परिस्थितींत कोणाकडूनहि जास्ती दलाली घेतली जाऊं नये, असा नियंत्रणाचा कायदा सरकारनें लवकर करावा."

#### ग्रामपंचायतीचें उत्पन्न अपुरें पडेल काय ?

ग्रामपंचायत बिलावर भाषण करतांना, पंचायतीस घरपट्टीपासून मिळणारें उत्पन्न तिच्या खर्चास पुरणार नाहींत, असें श्री. जमनादास मेहता ह्यांनीं सांगितलें होतें. त्यांच्या ह्या विधानास उत्तर देतांना श्री. बापूसाहेब गुप्ते (पार्लमेंटरी अंडर सेक्रेटरी) ह्यांनीं पुणें जिल्ह्यांतील पंचायतींचा दाखला दिला. ह्या १८ पंचायतींचें सालिना उत्पन्न १५८ ते २,२०० रुपये आहे, असें ते म्हणाले. दिवाणी व फौजदारी दाव्यांपासून मिळणारें उत्पन्न घरपट्टींत मिळविलें असतां अगदीं लहान खेड्यांतील पंचायतीसहि सालिना १५० रुपये उत्पन्न मिळण्यास अडचण पडणार नाहीं, असें त्यांनीं सांगितलें.

### बार्शी सेंट्रल को. बँक लि.
( वार्षिक सभा : २५-९-३८ )

वरील बँकेचा ३२ वा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. बँकेचे पटावर ५९ सोसायट्या आणि ८२९ व्यक्ती मिळून ८८८ सभासद आहेत. बँकेचें भाग भांडवल ७९,७१० रुपये आहे. अहवालाचे वर्षी बँकेकडील ठेवींत ३८ हजारांची घट झाली. परंतु दिलेल्या कर्जाची रकम मात्र ३९ हजारांनीं वाढली. बँकेच्या वैराग शाखेच्या उत्पन्न खर्चाची ह्याहि सालीं तोंडमिळवणी होऊन तिचा बोजा मुख्य कचेरीवर पडला नाहीं. सालअखेरीस थकबाकी ४३,९९९ रु. आहे, त्यापैकी ४,७२२ रुपये तीन सोसायट्यांकडे येणें असून बाकीची रकम व्यक्तिशः सभासदांकडे थकलेली आहे. बँकेकडील एकूण ठेवी सुमारें ४ लक्ष रुपयांच्या असून रिझर्व्ह फंडांत सुमारें ५३ हजार रुपये आहेत. अहवालाचे सालीं बँकेस निव्वळ नफा ११,३६३ रुपये झाला. भागीदारांस ७ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठी ५,६०० रुपयांचा विनियोग करावा अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. बँकेचें काम सुव्यवस्थित चालू आहे.

### मुंबई असेंब्लींतील दोन बिलें

मुंबई प्रांतिक असेंब्लीनें कॉटन जिनिंग अॅन्ड प्रेसिंग फॅक्टरीज अॅक्ट अमेंडमेंट बिलाचीं तीनहि वाचनें पास केलीं आहेत. ह्या बिलान्वयें,वाया गेलेल्या कपाशीची कपाशीमध्यें भेसळ करणें गैरकायदा होणार आहे. त्याचप्रमाणें, कपाशीमध्यें बुद्धिपुरःसर पाणी घालून तिचें वजन वाढविणें—पाण्याच्या वजनाचें हें प्रमाण कायद्याच्या मर्यादेंत असलें तरी—हा गुन्हा ठरणार आहे. १८९४ सालच्या लँड अॅक्विझिशन अॅक्टांतहि दुरुस्ती करणारें बिल असेंब्लीनें मंजूर केलें आहे. ह्या बिलानें, जमिनीबाबत दिलेल्या मोबदला रकमेवरील व्याजाचा दर सहा टक्यांचा चार टक्के केला आहे.

### भुसावळ येथें नवीन सहकारी बँक

पू. खानदेशांतील भुसावळ, रावेर आणि यावल तालुके व एदलाबाद पेटा ह्यांसाठी स्वतंत्र बँक स्थापन करण्यासंबंधीं विचार विनिमय करण्याकरितां भुसावळ येथें दि. ब. पाटील ह्यांचे अध्यक्षतेखाली खानदेश विभागाचे असिस्टंट रजिस्ट्रार ह्यांनीं एक सभा भरविली होती. भाग भांडवल जमविण्याकरितां सभेनें एक कमिटी नेमली आहे. ५ हजार रुपये जमतांच रजिस्ट्रारकडे रीतसर अर्ज करण्यांत येईल.


## नोटीस
### पूना मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें
[ फक्त सभासदांकरितां ]

या बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. १८-९-३८ रोजीं दुपारीं ३ वाजतां नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरेल. त्यावेळीं मागील वार्षिक सभेचें प्रोसिडींग, ता. ३० जून, १९३८ अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफ्याची वांटणी मंजूर करणें, १९३८-३९ चें अंदाज पत्रक मंजूर करणें, ३०।६।३७ अखेर मे. स्पेशल ऑडिटरसाहेब को. सो. यांजकडील तपासणी—यादीचा विचार करणें, कौन्सिल, कौन्सिलचे अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेंच बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व हिशेब तपासनीस निवडणें, पोटनियम २३ (५) प्रमाणें भांडवलाची मर्यादा ठरविणें, ता. १२-९-३७ च्या वार्षिक सभेनें सुचविलेल्या दुरुस्त्या व नवीन पोट नियम दुरुस्त्यांचा विचार करणें वगैरे कामें करण्यांत येतील तरी सभासदांनीं अवश्य यावें.

बुधवार पेठ, बोर्डाचे हुकुमावरून
पुणें. ३०-८-३८ व्ही. जी. गोखले
एजंट.

### बार्शी सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि.
( स्थापना १९०६ )
## नोटिस

बँकेच्या सर्व मेंबरांस कळविण्यांत येतें कीं, बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा तारीख २५ सप्टेंबर, १९३८ रविवार रोजीं दुपारीं ( ३ ) वाजतां बार्शी येथें बँकेचे ऑफिसमध्यें खालील विषयांचा विचार करण्याकरतां भरेल. तरी त्यावेळीं सर्व मेंबरांनीं हजर रहावें अशी विनंती आहे.

( १ ) ता. ३०-६-३८ अखेरचे हिशोब व मॅनेजिंग बोर्डानीं केलेला रिपोर्ट मंजूर करणें;

( २ ) शेअरवर देण्याचा डिव्हिडंडचा दर ठरविणें.

( ३ ) बँकेच्या पोट नियम २७ (३) यांस अनुसरून चालू सालीं रिटायर झालेल्या डायरेक्टरांचे जागीं नवीन निवडणूक करणें.

व्यक्तिशः सभासदांतर्फे डायरेक्टरांपैकीं श्री. जी. आर. काळे हे व सोसायट्यांतर्फे डायरेक्टरांपैकीं श्री. डी.बी.कासीद हे रिटायर्ड होत आहेत.

( ४ ) नोटिस बोर्डावर लावलेल्या यादीप्रमाणें पोट नियम दुरुस्त करणें.

( ५ ) व्यक्तिमात्र सभासदांस रु. ३००० पर्यंत कर्ज मिळणेचे अर्ज मंजूर करणें.

सदर अर्ज साधारण सभेपूर्वी निदान एक दिवस अगोदर दिले पाहिजेत.

( ६ ) सन १९३८-३९ सालामध्यें बँकेनें उभारावयाच्या भांडवलाची मर्यादा ठरवणें.

( ७ ) चेअरमन यांचे परवानगीनें आयतेवेळीं येणारीं दुसरीं कामें.

बार्शी बोर्डाचे हुकुमावरून
ता. २४-८-३८ र. प. पटवर्धन
मॅनेजर.

## पुणें मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें शहर.
### या बँकेंत खालीलप्रमाणें ठेवी स्वीकारल्या जातात

| | | |
|---|---|---|
| चालू ठेव | | द. द. शे. १ टक्का. |
| सेव्हिंग्ज ठेव. | | द. द. २½ ,, |
| कायम ठेव | मुदत १ वर्षे | द. द. ३½ ,, |
| ,, | ,, २ ,, | द. द. ३¾ ,, |
| ,, | ,, ३ ,, | द. द. ४¼ ,, |
| ,, | ,, ५ ,, | द. द. ४½ ,, |

ग. म. नलावडे,
चेअरमन.

## संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

### पश्चिम खानदेश जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट, धुळें

मुंबई इलाख्याचे गव्हर्नर व त्यांच्या पत्नी ह्यांनीं प. खा. जिल्ह्यास ता. २५।८।३८ रोजीं भेट दिली, त्या वेळीं त्यांनीं धुळें शहरापासून दोन मैलांवर असलेल्या मोहाडी ह्या खेडेगांवासहि भेट दिली. ग्रामसुधारणा कमिटीनें सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीनें सदर गांवाची सर्वांगीण सुधारणा घडवून आणिली आहे. तिचें निरीक्षण केल्यावर त्यांनीं मोहाडी येथें भरविलेल्या प्रदर्शनांतील प्रत्येक भाग अवलोकन केला. मोहाडी येथें नुकतीच सहकारी मल्टी पर्पज सोसायटी स्थापन झाली आहे. तिचे उद्देश खानदेश विभागाचे असि. रजिस्ट्रार श्री. आर. एस. पाटील ह्यांनीं समजावून सांगितल्यावर प्रदर्शनांतील अनेक विभागांबरोबर इन्स्टिटयूटनें सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांच्या मदतीनें ठेविलेल्या सहकारी विभागासहि त्यांनीं भेट दिली. सदर विभागांत ठळक शब्दांत लिहिलेल्या सहकारी म्हणी, सहकारितेचे दहा मुद्दे, निरनिराळ्या सोसायटयांचे उद्देश, सहकारी चळवळीची ( क्रेडिट व नॉन्‌-क्रेडिट ) प्रगति दाखविणारे नकाशे, कोपडगे सोसायटीच्या मेंबरांनीं तयार केलेली खादी, पीक संरक्षक, कॅटल फार्म, डेअरी व कुंपण ह्या सोसायटयांचे नमुने, कासोदें व धुळें येथील विणकर सोसायटयांनीं तयार केलेलीं पातळें, लुगडीं, सतरंज्या व झोरे, रावेर येथील फळें विकणाऱ्या सोसायटीचे केळ्यांचे घड, मोसंबीं व इतर आकर्षक वस्तू ठेविल्या होत्या.

सदर विभाग शक्य तितका उद्बोधक व चित्ताकर्षक व्हावा अशा रीतीनें मांडण्यांत आला होता. हा विभाग पाहण्यास सुमारें २००० लोक आले होते. प्रदर्शन ता. २५ व २६ पर्यंत खुलें ठेवण्यांत आलें होतें. सहकारी विभागाची माहिती ॲग्रि. ऑर्गनायझर श्री. भोळे व इन्स्टिटयूटचे कारकून श्री. जोशी ह्यांनीं सुबोध भाषेंत सर्वांस दिली. सदर विभाग यशस्वी करण्याचे कामीं सहकारी खात्याचे अधिकारी, सुपरवायझर्स व इतर सहकारी धु ह्यांनीं फारच मदत केली.

### दि महाड को. अर्बन बँक लि.

( वार्षिक सभा : ११-९-३८ )

वरील बँकेचें खेळतें भांडवल १७,१०० रुपये झालें असून तिचेकडील ठेवींची रकम सुमारें ५८ हजार रुपये झाली आहे. रिपोर्टाचे वर्षाचे आरंभीं तिचें खेळतें भांडवल ४४ हजार रुपये होतें, तें सालअखेर ७५ हजार रुपये झालें आहे. बँकेच्या एकंदर देवघेवीच्या व्यवहारांतहि १½ लक्ष रुपयांची वाढ झाली. बँकेचे ६४ हजार रुपये रोख शिल्लक व इतर बँकांतील खात्यांवर असून सुमारें १० हजार रुपये सरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत आणि कॅश क्रेडिट व कर्जखातीं अनुक्रमें फक्त ४२९ व ४,२२० रुपये आहेत. म्हणजे, बँकेच्या एकूण भांडवलापैकीं फारच लहान भाग भागीदारांस कर्जाऊ दिलेला आहे. बँकेचें भांडवल त्यामुळें अर्थातच पूर्णपणें खेळतें राहिलें आहे. तथापि, व्यापार व उद्योग ह्यांचेसाठीं जनतेस खेळता पैसा पुरवण्याचा प्रयत्न ह्यापुढें बँकेनें केला पाहिजे. अहवालाचे वर्षीं बँकेस १०५७ रुपये निवळ नफा झाला, त्यांतून भागीदारांस द. सा. द. शे. ५ टके दरानें डिव्हिडंड यावें अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे.

### शंभर वर्षांपूर्वींचा रेल्वे प्रवास

शंभर वर्षांपूर्वींच्या आणि आतांच्या रेल्वे प्रवासांत किती फरक पडला आहे, हें १८३८ सालीं फ्रान्समध्यें प्रसिद्ध केलेल्या, एका रेल्वे वेळापत्रकांतील उतारूंस दिलेल्या सूचनांवरून ध्यानांत येण्याजोगें आहे. ह्या सूचनांपैकीं कांहीं खालीं उद्धृत केल्या आहेत:—

( १ ) उतारूस आपली जागा बदलावयाची असल्यास त्यानें कंडक्टरला कळवलें पाहिजे आणि डब्यांतून थोड्या वेळापुरतें बाहेर जावयाचें असल्यास त्यानें पास घेतला पाहिजे. ( २ ) शेजारच्या उतारूंशीं अति लवकर परिचय करून घेऊं नये. पत्ते खेळतांना उतारूंनीं पैसे घालवल्यास रेल्वे कंपनी त्याबद्दल जबाबदार नाहीं. ( ३ ) उतारूंच्या सोईसाठीं आगगाडीचा वेग कधींहि कमी करण्यांत येणार नाहीं. प्रवासाच्या सुरक्षिततेस बाध येणार नाहीं ह्या बेतानें, कायम परंतु मध्यम वेगानें, आगगाडीचा वेग ठेवण्याविषयीं इंजिनियर्सना ताकीद दिलेली आहे.

### फ्रान्स देशाचे खरे सूत्रचालक

फ्रान्स हा देश प्रजासत्ताक असला, तरी बँक ऑफ फ्रान्सच्या बारा डायरेक्टरांचे हातीं खरी प्रभावी सत्ता आहे. ९५ कंपन्यांच्या डायरेक्टरांचे जागेपैकीं १५० जागा ह्या १२ लोकांनीं काबीज केलेल्या असून फ्रान्समधील उद्योगधंद्यांचा शेकडा ६० इतका भाग त्यांचे नियंत्रणाखालीं आहे. बँका, रेल्वे कंपन्या, खाणी, आगबोट कंपन्या, वीज कंपन्या, विमा कंपन्या, पोलादाचे कारखाने, ह्या सर्वांचें चालकत्व त्यांचे हातीं आहे. बँक ऑफ फ्रान्स ही संस्था खासगी असून सुमारें २०० घराण्यांचे ताब्यांतील मतांवर तिचे डायरेक्टर निवडून येतात. कोणत्याहि मुख्य प्रधानास खालीं ओढण्याचें काम बँकेस सुलभतेनें करतां येतें; सरकारास पैसे कर्जाऊ देण्याचें बंद केलें म्हणजे झालें !

### कपास बाजाराचें क्लिअरिंग हाउस

वायद्याचे करारांतील देण्यां-घेण्यांतील तफावतीची रकम रोखीनें देण्या-घेण्याची योजना मुंबई येथील कॉटन एक्सचेंजच्या क्लिअरिंग हाउसनें केली आहे. १९१८ सालीं ह्या पद्धतीस प्रारंभ झाला. बँकर्स क्लिअरिंग हौसमधील चेक्सच्या देवघेवीचे आकड्यांवरून व्यापाराचें मान ज्याप्रमाणें अजमावतां येतें त्याचप्रमाणें कॉटन एक्सचेंजच्या क्लिअरिंग हाऊसमधील देवघेवीचे आकड्यावरून कपाशीच्या बाजारांतील उलाढालींची कल्पना येते. १९१८-१९ साल हें क्लिअरिंग हाउसमधील व्यवहाराचे दृष्टीनें महत्त्वाचें होतें. त्या वर्षाइतका व्यवहार क्लिअरिंग हाउसमध्यें अद्याप कोणत्याहि वर्षीं झालेला नाहीं. १९२४-२५ सालीं कपाशीचा बाजार अगदींच मंदावला असल्याचें दिसतें. खालील आकडे वर निर्दिष्ट केलेल्या वस्तुस्थितीचे निदर्शक आहेत:—

| वर्ष | क्लिअरिंग हाउसमधील व्यवहार ( कोटि रुपये ) |
|---|---|
| १९१८-१९ | १४ १/४ |
| १९२४-२५ | ३ १/५ |
| १९३०-३१ | ३ ३/५ |
| १९३६-३७ | ४ ३/४ |

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

## विमाविषयक एक दावा

अकबरअल्ली शरफअल्ली ह्यांनीं स्वतःच्या आणि आपल्या पत्नीच्या नांवानें सहा हजार रुपयांचा संयुक्त विमा उतरला होता. २९ मार्च, १९३४ रोजीं त्यांच्या पत्नीची वैद्यकीय तपासणी झाली आणि २४ जुलै रोजीं कंपनीच्या पत्राप्रमाणें त्यांनीं विम्याचा पहिला हप्ता भरला. २७ नोव्हेंबर रोजीं कंपनीनें त्यांस पक्की पॉलिसी दिली. फेब्रुवारी, १९३५ मध्यें अकबरअल्ली ह्यांची पत्नी प्रसूत झाली. १४ जुलै, १९३५ रोजीं ती निवर्तली. कंपनीकडे क्लेमच्या पैशाची त्यांनीं मागणी केली, तेव्हां अकबर अल्ली ह्यांची पत्नी गरोदर असल्याचें पॉलिसी देण्यापूर्वी कंपनीस कळविण्यांत आलें नाहीं ह्या मुद्यावर कंपनीनें पैसे देण्याचें नाकारलें. विम्याच्या अर्जाचे मंजुरीचे वेळीं पत्नी गरोदर असल्याचें पतिपत्नीस कोणासच माहित नव्हतें, असें अकबरअल्ली ह्यांनीं सांगितलें; तथापि ही बाब महत्त्वाची असूनहि कंपनीस न कळल्यामुळें विमापत्र रद्द होतें असा कंपनीतर्फे मुद्दा मांडण्यांत आला. आपल्या पत्नीच्या मृत्यूशीं ती बाळंत होण्याचा कांहीं संबंध नव्हता; ती पुत्रप्राप्तीनंतर पांच महिन्यांनीं निवर्तली, असें अकबरअल्ली ह्यांनीं कोर्टास सांगितलें. अखेर, विमा कंपनी आणि वादी ह्यांमध्यें तडजोड होऊन कंपनीनें वादीस २ हजार रुपये आणि दाव्याचा खर्च देण्याचें कबूल केलें.

---

## कॉटन एक्सचेंजमधील उद्घाटन समारंभ

काळबादेवी (मुंबई) येथील कॉटन एक्सचेंजच्या तळमजल्यावरील ट्रेडिंग हॉलचें (व्यवहाराच्या दालनचें) उद्घाटन श्री. वल्लभभाई पटेल ह्यांचे हस्तें गेल्या आठवड्यांत झालें. ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनचे अध्यक्ष, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, ह्यांनीं प्रथम स्वागतपर भाषण करून, मुंबई शहरांतील कपाशीच्या व्यापाराचा इतिहास निवेदन केला. मुंबई शहरांतील कपास बाजार सबंद आशिया खंडांत सर्वांत मोठा असल्याचें त्यांनीं सांगितलें. १८७५ सालापासून, असोसिएशनमध्यें लवादामार्फत तक्रारींचा निकाल लावण्याची पद्धत अंमलांत आहे. त्यामुळें कोर्टाकडे जाण्याची सभासदांवर पाळी येत नाहीं, असें ते म्हणाले. मुंबई शहरांतील कपाशीच्या बाजारावर एकतंत्री नियंत्रण नसल्याचा त्यांनीं उल्लेख केला, आणि जोपर्यंत एकाच शहरांत अनेक ठिकाणीं कपाशीचा व्यवहार होऊं शकतो, तोपर्यंत रात्रींसुद्धा व्यवहार चालू ठेवणें भाग पडतें आणि त्यामुळें नोकरवर्गास दररोज १४ तासांहून अधिक काम पडतें, असेंहि त्यांनीं सांगितलें. श्री. वल्लभभाईंनीं शेतकऱ्यांच्या हिताची काळजी वहाण्याविषयीं व्यापाऱ्यांस सल्ला दिला. शेतकऱ्यांच्या उन्नतीवरच कपाशीचा व्यापार अवलंबून आहे, असें ते म्हणाले.

---

## स्त्रीकामगारांच्या मुलांचा सांभाळ

ज्या कारखान्यांत शंभरपेक्षा अधिक स्त्रीकामगार कामावर असतील, अशा ठिकाणीं स्त्रीकामगारांच्या सहा वर्षांखालील मुलांसाठीं स्वतंत्र खोली अगर खोल्या राखून ठेवण्यांत आल्याच पाहिजेत, असा नियम मुंबई सरकारनें केला आहे. हीं मुलें सांभाळण्याकरितां अनुभवी परिचारिका नेमली पाहिजे, असाहि नियम आहे. हा नियम लागू असणाऱ्या १५३ कारखान्यांची यादी मुंबई सरकारनें नुकतीच प्रसिद्ध केली आहे. अशा प्रकारची व्यवस्था सध्या मुंबईत ३१ कारखान्यांत, अहमदाबादमध्यें ६८ कारखान्यांत आणि सोलापुरांत ७ कारखान्यांत आहे.

---


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

**स्थापना १९११.**

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

**शाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ भिवंडी ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ वाई ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

**या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात**

आणि

**फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.**

शिवाय

**इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.**

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## मराठी केन्द्र संस्थेचे नवे अभ्यासक्रम

पुणें येथील अत्यंत लोकप्रिय मराठी केन्द्र या व्यापारी शिक्षण देणाऱ्या संस्थेनें यंदाचे सालापासून इंडियन मर्चंट्स चेंबर या संस्थेचे बँकिंग आणि अकौंटन्सी डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

ही संस्था सरकारमान्य असून दरवर्षी होणाऱ्या सरकारी परीक्षांत या संस्थेचा नंबर उच्च श्रेणींत लागतो. श्री. श्रीं. वा. काळे बी. ए. (ऑनर्स) हे अर्थशास्त्र व बँकिंग शिकवितात, श्री. आगाशे, एम. ए., एलएल. बी., बी. टी., हे व्यापारी गणित आणि इंग्रजी शिकवितात, श्री. भागवत, बी. ए. एलएल. बी. हे कंपनी आणि मर्कंटाईल लॉ शिकवितात, आणि श्री. आर. एन. गाडगीळ, बी. कॉम. यांचेकडे बुककीपिंग आणि अकौन्टन्सी हे विषय आहेत. त्याचप्रमाणें मराठी आणि इंग्रजी लघुलेखन शिकविण्यांत संस्थेचे चालक श्री. थत्ते यांचा हातखंडा आहे. आतांपर्यंत नवीन अभ्यासक्रमाकरितां १५ विद्यार्थ्यांनीं नांवें दाखल केलीं आहेत. त्यांत कॉलेजांतील विद्यार्थी आणि बँकांत व इतरत्र नोकरी करणारे विद्यार्थी आहेत. अभ्यासाची वेळ सर्वांना सोयिस्कर व्हावी म्हणून सायंकाळीं ६ ते ९पर्यंत ठेवली आहे. संस्थेनें फोनोग्राफवर टंकलेखन शिकविण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.

सौ. राणी राजवाडे यांचे हस्तें नव्या वर्षाच्या अभ्यासक्रमास नुकतीच सुरवात करण्यांत आली. पुढल्या वर्षापासून संस्था मॅट्रिक नापास विद्यार्थ्यांचेकरितां शिक्षणप्रसारक मंडळीच्या स्कूल ऑफ कॉमर्स या संस्थेनें सुरू केलेला जी. डी. सी. चा अभ्यासक्रम सुरू करणार आहे. या परीक्षेला सरकारी नोकरींत मान्यता मिळालेली असून ही परीक्षा मॅट्रिक परीक्षेच्या तोडीची आहे असें प्रसिद्ध झालें आहे.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११७–१४ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०३—३ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८–१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९९—१ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९–१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०९–१२ |
| ४% म्हैसुर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | ११२—४ |
| ५% म्हैसुर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४४—० |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% ... ... | ११२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०–४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५२—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ६% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११७—४ |


## ६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी
## लिमिटेड, पुणें.

'ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

## दि प्रॉव्हिन्शिअल बँक
### ऑफ अिण्डिया लिमिटेड
स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. अॅण्ड. अेम् स्टेशन ) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटींवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधींची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यांवर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें.

एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

अप-टु-डेट शिलाई करतां

**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**

बुधवार चौक, पुणें | १२ तासांत कपडे शिवून मिळतील. | [ खादी भांडाराचे माडीवर

**पराडकर टेलर्स ॲकॅडेमी**

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**सुप्रसिद्ध संचालक मंडळ** व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनकिरतां **महाराष्ट्र, कर्नाटक** आणि **गोमांतक** प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.**

**( हेड ऑफिस : जळगांव )**

माहिती मागवा | **चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस,** लक्ष्मी रोड, **पुणें २**




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

**सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा**

**मोती चौक : : : सातारा**

**K. K. & Co.**

**Photographic Dealers**

**POONA.**

**'अभिनंदनीय प्रगति'** असेच बोल नाशिकच्या **सह्याद्रि** विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. | **मॅनेजिंग डायरेक्टर**


**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँक आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली


**S. B. JOSHI & Co.**

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.


हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.